Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

# Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 07/05/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

News Paper Name: आपलं महानगर

Page No. 04



# कवी, तत्वचिंतक रवींद्रनाथ टागोर

रवींद्रनाथ टागोर हे चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार होते. त्यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांनी इतिहास, खगोलशास्त्र, विज्ञान, कालिदासाचे काव्य व संस्कृत आदींचे अध्ययन केले.१८७७ मध्ये प्रकाशित झालेल्या रचनांमुळे रवींद्रनाथ प्रथम लोकांसमोर आले. यात मैथिली कवीच्या विद्यापतीप्रवर्तित शैलीत रचलेल्या काही दीर्घ कविता होत्या. त्यांनी 'संध्या-संगीत' (१८८२), बंगाली भाषेतील पहिली लघुकथा 'भिकारिणी' व सुप्रसिद्ध कविता 'निझरिर स्वप्नभंग' आदी रचना लिहिल्या. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत रवींद्रनाथांचे मोठे योगदान होते.

१९०१ मध्ये रवींद्रनाथ सियाल्दा सोडून शांतिनिकेतन येथे राहण्यास आले. एका आश्रमाची स्थापना करणे हा त्यांचा उद्देश होता. या आश्रमात त्यांनी एका प्रार्थनागृहाची, प्रयोगशील शाळेची, बागबगिचा व ग्रंथालयाची स्थापना केली. या काळात त्यांचे साहित्य बंगाली व विदेशी वाचकांचे आधिकाधिक लक्ष खेचू लागले होते. 'नैवेद्य' (१९०१) व 'खेया' (१९०६) या रचना या काळात प्रकाशित झाल्या. १९१५ साली त्यांना ब्रिटिश सरकारने 'सर' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. १९२१ मध्ये रवींद्रनाथ व कृषी-अर्थतज्ज्ञ लिओनार्ड के. एल्महिर्स्ट् यांनी 'श्री-निकेतन' ही संस्था स्थापन केली. श्री निकेतनच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या प्रतिकात्मक स्वराज्य चळवळीला पर्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. ज्ञानसंवर्धनातून अज्ञानी व असहाय्य ग्रामीण भागाची सुटका होईल या उद्देशाने त्यांनी विविध देशातील विद्वान, दाते व अधिकाऱ्यांस या उपक्रमात सहभागी करून घेतले. १९३० पासून त्यांनी भारतातील पराकोटीच्या जातीयतेविरुद्ध प्रचार सुरू केला. नाट्य-कविता यांद्वारे जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा या महान तत्वचिंतकाचे ७ ऑगस्ट १९४१ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 07, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401